

# संख्येचे शेजारी,
# लगतची मागची व पुढची संख्या

संख्यारेषा अशी असते.

एका रेषेवर डाव्या बाजूला शून्य या संख्येची खूण असते. तेथून सोईचे लहान अंतर घेऊन, एकापुढे एक मोजून, सारख्या अंतरांवर १, २, ३, ४,... अशा संख्या लिहिलेल्या असतात.




या रेषेचा कोणताही भाग पाहा. या रेषेवरील कोणतीही एक, समजा, २३ ही संख्या घेतली.




लगतची मागची [२२] ← [**२३**] → [२४] लगतची पुढची.

**काय लक्षात येते ?**

कोणत्याही संख्येच्या डावीकडची म्हणजेच लगतची मागची संख्या १ ने कमी आहे तर उजवीकडची म्हणजेच लगतची पुढची संख्या १ ने जास्त आहे.

रिकाम्या चौकटीत लगतची मागची व लगतची पुढची संख्या लिही.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ५४ | | | ७९ | | | ४० | |
| | ३७ | | | ६२ | | | ९९ | |
| | ५० | | | ७८ | | | ३२ | |
| | ३९ | | | ३० | | | ६८ | |

HZ98L8